क्रमांक/यजिप/साप्रवि/परिषद/ १५०६ /०१४
यवतमाळ जिल्हा परिषद, यवतमाळ
(सामान्य प्रशासन विभाग)
यवतमाळ, दिनांक :- २३.०६.२०१४

**प्रति,**

**सन्मा. श्री / श्रीमती ------------------------------------------**

**सदस्य, स्थायी समिती, जिल्हा परिषद, यवतमाळ**

**मुक्काम ---------------------- पोष्ट --------------------**

**तालुका --------------------- जिल्हा: यवतमाळ.**

**मार्फत :-** **गट विकास अधिकारी, पंचायत समिती -----------------------**

****

दिनांक १३.०६.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समितीं सभेचा अहवाल आपले माहिती करिता या सोबत पाठविण्यात येत आहे.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

**सचिव,**
**स्थायी समिती**
**जिल्हा परिषद, यवतमाळ.**

**प्रतिलीपी :-**

१] मा.नामदार श्री. ----------------------------------------------------
------------------------------------------- महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर.

२] मा. श्री. -------------------------------------- खासदार / आमदार.

मुक्काम -------------------- पोष्ट -------------- तालुका --------------------

जिल्हा------------------- यांना माहितीस्तव सविनय सादर.

३] मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, / मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सादर.

४] मा. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. यवतमाळ यांना माहीती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता.

५] ---------------------------------------- जि. प. यवतमाळ (सर्व खातेप्रमुख) यांना माहिती तथा पुढील योग्य कार्यवाहीस्तव रवाना. आपले विभागाशी संबंधीत असलेले विषय, चर्चा व सुचना यावर नियमानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल मा.अध्यक्ष, व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे स्वतंत्ररित्या त्वरीत सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच अनुपालन अहवालाच्या २५ प्रती (विहीत प्रपत्रात) तात्काळ सा.प्र.वि.च्या परिषद विभागाकडे सादर कराव्या.

६] गट विकास अधिकारी, पंचायत समिती ----------------- (सर्व)

****

## दिनांक १३.०६.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

दिनांक १३.०६.२०१४ रोजी स्थायी समितीचे सभापती मा.श्री.प्रविण विनायकराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली १.०० वाजता घेण्यात आली. सभेला जि.प.चे खालील सन्मा.पदाधिकारी, सन्मा. स्थायी समिती सदस्य, मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी , खाते प्रमुख, व आमंत्रीत अधिकारी उपस्थित होते.

| **मा. सर्व श्री./श्रीमती** | | | |
|---|---|---|---|
| श्री.प्रविण विनायकराव देशमुख | सभापती, स्थायी समिती | श्री.ययाती मनोहरराव नाईक | उपाध्यक्ष, जि.प.यवतमाळ |
| श्री.सुभाष मधुकराव ठोकळ | सभापती, अर्थ व बांध.स. | श्री.मनमोहनसिंग अमरसिंग चव्हाण | सभापती,शिक्षण व आ.स. |
| श्री.प्रभाकर राघोजी उईके | सभापती स.क.स. | सौ.प्राजक्ताताई निमीष मानकर | सभापती,म.व बा.क.स. |
| - | - | श्री. देवानंद न. पवार | सदस्य |
| श्री.अनिल भगवानराव नरवाडे | सदस्य | श्री.अमन हनुमंतराव गावंडे | सदस्य |
| सौ.संगीताताई अनिल राजुरकर | सदस्य | सौ. उमाताई विजय पिदुरकर | सदस्य |
| श्री. दिवाकर धनु राठोड | सदस्य | - | - |
| **आमंत्रीत अधिकारी** | | | |
| डॉ. शरद कुलकर्णी | अति.मु.का.अ. | श्री.अरुण मोहोड | उप मु.का.अ.(सा.)तथा प्र.उप मु.का.अ.(पंचा.) |
| श्री.व्ही.के.मरसाळे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म.व.बा.क.) | सौ.ज्योती भोंडे,व.ले.अ. (प्रतिनिधी) | मु.ले.व वि.अ. |
| श्री. एस.एस.तपासे, | का.अ.बांधकाम क्र.१ | श्री. ए.एम.नितनवरे | का.अ.बांधकाम क्र.२ |
| श्री. शि.वा.वद्देवार | कार्य.अभि.(सिंचन) | श्री. एम.एम.गवई स.ले.अ. (प्रतिनिधी) | समाज कल्याण अधिकारी |
| श्री. पी.पी.देशपांडे | उप अभि. (यां.)भु.स.वि.य. | श्री.के.एम.मानकर (प्रतिनिधी) | कार्य.अभि.(पा.पु.) |
| श्री.जे.आर.राठोड, | कृषि विकास अधिकारी | डॉ.के.झेड. राठोड | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| डॉ. श्री.दिलीप सोनकुसरे | जि.पशु संवर्धन अधि. | श्री.व्ही.जे.वालदे | व. भू.वै.भू.स.वि.यं.यवतमाळ |
| श्री.अ.वि.सुने (प्रतिनिधी) | जि.ग्रा.वि.अ.यवतमाळ | श्रीमती सुचिता पाटेकर | शि.अ. (प्राथ.) जि.प. यवत. |
| श्री. विजय समदुरकर (प्रति.) | का.अ.म.जि.प्रा.यवतमाळ | श्री. टि.व्हि. किरोळीकर | सहा.अधि.अभि.म.वि.वि.कं. |
| श्री.मनोजर निरंजने(प्रतिनिधी) | उपसंचालक सा.वनि.वि. | श्री.आर.आर. खरोडे | वि.अ.(पंचा.) |
| श्री.चंद्रकांत कारीया | उप.का.प्रं.ग्रा.स.यो. | श्री.सी.सी.मनवर, (प्रतिनिधी) | जि.अ.कृ.अधि.यवतमाळ |
| श्री.लि.रा. वाघमारे | उप.का.अ.बांध.उपवि क्र.१ | श्री.बी.के.सावदे, सहा. अभि.(प्रति.) | कार्य.अभि.म.वि.वि.कं. पांढरकवडा |
| श्री.व्ही.जे.वालदे | वरिष्ठ भू.वै.भू.स.वि.य. | श्री.संजय वि.गावंडे | स्वि.स.मा.उपाध्यक्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. नि.के.शहाडे | क.अभि.(पा.पु.) | श्री. पी.के.भोंग | स्वि.सहा. मा.अध्यक्ष,जि.प. |
| श्री.भानुदास चरडे | स्विय सहा.उप.मु.का.अ.(सा. | श्री.पी.एम.मंडलिक | शाखा अभि.जि.प.(सिंचन) |
| श्री.एन.पी.कोडगीरवार | क.प्र.अ. सा.प्र.वि. | श्री.यु.व्ही.बेजलवार | स्वि.स.सभा.बांध व अर्थ स. |
| श्री.अरुण नक्षणे | स्वि.स.सभा.शि.व आ. स. | श्री.पवन आत्राम | स्वि.स.सभा.स.क. स. |
| श्री.श्रीकांत मडावी | कनि.सहा.सा.प्र.वि. | श्री.संजय वानखडे | कृ.अ. (नरेगा) |
| श्री. पि.एस.गोबरे | कनि.सहा.,सा.प्र.वि. | श्री.व्ही.के.घरडे | समाज कल्याण विभाग |
| श्री.व्ही.पी.चहाकार | आरोग्य सहा.जि.आ.अ. | श्री.बी.पी.राठोड | स.प्रअ. शि.अ.(प्राथ.) |

सर्वप्रथम सचिवांनी मा.पदाधिकारी व सन्मा.स्थायी समिती सदस्यांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष स्थायी समिती यांचे पुर्वपरवानगीने सभेचे कामकाज सुरु केले. मा. सभापती (स्थायी समिती) यांनी नव्याने रुजु झालेल्या अधिका-यांनी स्वत: चा परिचय सभागृहास करुन द्यावा असे सुचविले असता श्री. अरुण मोहोड यांनी उप मु.का.अ.(सा.) म्हणुन जि.प.यवतमाळ या पदावर रुजु झाले असल्याचे सांगीतले.

**विषय क्र. १ :- दिनांक १५/५/२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालास मंजुरी देणे.**

**सन्मा सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी मागील सभेत जि.प. प्रशासकीय इमारत परिसरात असलेल्या अनधिकृत कॅन्टीन बाबत चा मुद्दा उपस्थित केला होता. **त्यावर का.अ. बांध. क्र.१** यांनी उक्त प्रकरणात क्रॉस एक्झामिनिशनसाठी २६ तारीख निश्चित करण्यात आली असल्याचे सांगीतले.

**सन्मा सदस्य सौ.उमाताई वि. पिदुरकर** यांनी मागील सभेत मौजे शिंदोला, ता. वणी शाळेचे निर्लेखनाबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर शि.अ.(प्राथ) यांनी निर्लेखनाचे एकुण ३७ प्रस्ताव प्राप्त झाले असल्याचे सांगुन वित्त विभागाने आचार संहिता असल्यामुळे फाईल परत पाठविले असे सांगीतले त्यावर **मा.सभापती स्थायी समिती** यांनी सदरचा प्रस्ताव पुनश्च वित्त विभागाकडे पाठवावा व मंजूर करून घ्यावा. त्याचप्रमाणे परिपूर्ण प्रस्तावास आजच्या सभेत मंजुरात देण्यात आली. तसेच धारमोहा येथील प्रस्तावास देखील मान्यता प्रदान करीत असल्याचे सांगीतले.

**मा.उपाध्यक्ष श्री. ययाती म. नाईक** यांनी मागील सभेत पुसद तालुक्यातील प्रसुतीगृहाचे बांधकाम अर्धवट असल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर जि.आ.अ. यांनी नव्याने इस्टीमेट तयार करण्यात आले असुन सात प्रसुतीगृहाचे बांधकामे घेण्यात आली असल्याचे सांगीतले.

**सन्मा सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी मागील सभेत मौजे सातेफळ ता. नेर येथील विहिरी व्यतिरिक्त अश्याच प्रकारच्या किती विहीरी आहेत या बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता **त्यावर का.अ. (पाणी पुरवठा)** यांचे प्रतिनिधीने मौजे नांझा येथील विहीर असल्याचे लक्षात आले आहे असे सांगीतले असता मा.उपाध्यक्ष यांनी अशा प्रकारच्या विहिरी असतील, असे वाटत नसल्याचे मत प्रदर्शित केले.

**मा.सभापती श्री. प्रभाकर रा. उईके (स.क.स)** यांनी मागील सभेत मौजे बेचखेडा, ता. यवतमाळ येथे म.ग्रा.रो.ह.यो **अंतर्गत** वृक्ष लागवडीमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर **म.ग्रा.रो.ह.यो.** चे कृषि अधिकारी श्री. वानखेडे यांनी उक्त प्रकरणाची चौकशी केली असता, संबंधीत कृषि अधिकारी (कंत्राटी) यांची जबाबदारी वृक्ष संगोपणाची होती, परंतु त्यांनी ती जबाबदारी पार पाडली नसल्यामुळे त्यांना नोटीस बजावण्यात आली होती. परंतु त्यांनी नोटीसचे उत्तर दिले नसल्यामुळे पुनश्च दुस-यांदा नोटीस देण्यात आली आहे. परंतु सबंधितांनी नोटीसचे उत्तर देखील सादर केले नसल्यामुळे व सबंधित कर्मचारी हा कंत्राटी असल्यामुळे त्यांची सेवा समाप्त करण्याची कार्यवाही करावी लागेल. त्याचप्रमाणे संबंधीत ग्राम सेवकास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असुन त्यांचेकडील खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सांगीतले.सदर विषयावर चर्चा होऊन **मा. सभापती (स्थायी समिती)** यांनी उक्त प्रकरणामध्ये करण्यात येणा-या कार्यवाहीची माहिती मा.सभापती (स.क.स) यांना देण्यात यावी. तसेच वणी तालुक्यात सन २०१२-१३ मध्ये किती वृक्ष लागवड केली याबाबत माहिती घ्यावी व पुढील सभेत देण्याबाबतचे **निर्देश उप मु.का.अ.(पंचा.) यांना दिले.**

मागील सभेत दारव्हा तालुक्यातील दहेली, हातगांव, पिंपरी, खोपडी येथील शाळांची कामे अर्धवट असल्याबाबतचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्यावर शि.अ.(प्राथ.) यांनी उक्त प्रकरणी सबंधित मुख्याध्यापकांवर कार्यवाही करण्याचे प्रस्तावित असल्याचे सांगीतले.

**मा.सभापती (बांध.व अर्थ.)श्री. सुभाष म. ठोकळ** यांनी मागील सभेत मौजे आष्टा, सावरगांव, बोरीमहाल रासा,उमरसरा ग्रा.प. कडील तक्रारीबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. **त्यावर का.अ.बांधक्र.-१** यांनी मौजे आष्टा - सावरगांव येथील काम एक दोन दिवसांत सुरू करण्यात येणार असुन मौजा बोरीमहल, रासा, उमरसरा येथील कामे सुरू असल्याबाबत सांगितले.

**सन्मा सदस्य श्री. अनिल भ. नरवाडे** यांनी मागिल वर्षी पाणी टंचाईच्या कृती आराखडयामध्ये चार बोअर मंजूर होते परंतु प्रत्यक्षात कां घेण्यात आले नाहीत याबाबतची विचारणा केली.तसेच पं.स. ला **व.भू.वै.भू.स.वि.यं** यांनी दोन वर्षापासून कधीही भेट दिली नसल्याचे सांगीतले असता **व.भू.वै.भू.स.वि.यं.** यवतमाळ यांनी पं.स. ला भेट दिली असल्याचे सांगीतले. त्याचप्रमाणे पंचायत समितीमार्फत जो आराखडा येतो, त्याची आपल्याकडे स्क्रुटीनी होते व नळ योजनेच्या माध्यमातून पाणी पुरवठा व्हावयास पाहिजे असे सांगीतले. **सदर विषयावर चर्चा होऊन मा.सभापती (स्थायी समिती)** यांनी याबाबत सविस्तर माहिती बोलवीण्यात यावी व महागांव मध्ये ४ बोअर कां घेण्यात आले नाही याची विचारणा करुन पं.स.कडून प्रस्ताव येतात, परंतु एकही बोअर मंजूर होत नाही, तरी मागिल वर्षाची व या वर्षाची माहिती प्राप्त करुन सविस्तर माहिती सभागृहा समोर सादर करण्याचे **निर्देश का.अ.(पा.पु.) यांना दिले.**

**सन्मा सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी मागील सभेत धडक योजनेमधील अपूर्ण असलेल्या विहिरी बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर **का. अ.(सिंचन)** यांनी उक्त विषय ग्राम सभेमध्ये ठेवण्याबाबत पत्र दिले असल्याचे सांगुन अ.जा., अ.ज., म.ग्रा.रो.ह.यो. व इतर लाभार्थी धडक सिंचन योजनेमध्ये वर्ग करण्यात आले असुन शासनाकडील २३ जानेवारी २०१४ च्या शासन परिपत्रकानुसार त्याबाबतची वर्गवारी करण्यात आली असल्याचे सांगीतले असता **सन्मा. सदस्य** यांनी ३० जून शेवटची तारीख आहे व अजूनही मुल्यांकन झालेले नाही तेंव्हा आता काय करणार आहे याची विचारणा करुन शासनाच्या २३ जानेवारीच्या परिपत्रकाप्रमाणे काय कार्यवाही झाली याची माहिती देण्यात यावी असे सांगीतले. **यावर कार्यकारी अभि.(सिंचन)** यांना सविस्तर उत्तर सादर करता आले नसल्यामुळे सभागृहाने तिव्र नाराजी व्यक्त केली.

**सन्मा सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी ३० जून पर्यंत अपूर्ण राहिलेल्या विहिरीचे लाभार्थी सदर योजनेपासून वंचित राहिल्यास जबाबदारी कोणावर निश्चित केली जाईल याची विचारणा केली. त्यावर **का.अभि.(सिंचन)** यांनी गट विकास अधिकारी यांना पत्र दिले, शो कॉज दिल्या, एस.एम.एस. पाठविले, परंतु त्यांचेकडुन माहिती आली नाही, त्यामुळे या योजनेच्या अंमलबजावनीस विलंब झालेला आहे तसेच चार ग.वि.अ. यांना उक्त प्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या असल्याचे सांगुन केवळ ग.वि.अ. यांचे विलंबामुळे सदरहु योजना विफल ठरली असल्याचे सांगीतले.

**सन्मा सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी सदर योजनेला मुदतवाढ मिळण्याबाबतचा ठराव मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत शासनाकडे पाठविण्यात यावा असे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा. सभापती (स्थायी समिती)** यांनी खालीलप्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र. १-** **कास्तकारांनी खरीपाच्या पेरणीचे कामकाजास सुरवात केली असून शेतीच्या हंगामात शेतकरी विहीरीच्या कामाकडे लक्ष देऊ शकत नाही तसेच पावसाळा सुरू होणार असल्यामुळे विहीरीचे काम ३० जुन पर्यंत पुर्ण करणे शक्य नसल्याने शासन परिपत्रकात या योजने संदर्भात घालण्यात आलेली अट शिथील करुन सदर योजनेला मुदतवाढ मिळण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत ही सभा ठरावाव्दारे शासनास विनंती करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**ठरावानुसार पुढील कार्यवाही कार्य.अभि. (सिंचन) यांनी करण्याबाबत ही सभा निर्देश देते.**

**सन्मा सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी सन २०११-१२ मध्ये जिल्हा नियोजन समिती कडुन शाळेकरीता रुपये पाच लक्ष प्राप्त झाले होते. परंतु सदर्हु निधी खर्च झाला किंवा कसे याची विचारणा केली असता याबाबत पुढील सभेमध्ये सविस्तर माहिती अवगत करुन देण्यात येईल असे **का.अ.(बांध.क्र.१) यांनी सांगीतले.**

**सन्मा सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी कांही ठिकाणी शाळांचे बांधकामाकरिता निधी उपलब्ध करून दिलेला आहे. तरी निधीबाबत विभागाकडुन कोणती कार्यवाही करण्यात आली या बाबतची विचारणा केली असता **का.अ.(बांध-१)** यांनी कामाच्या निविदा उघडण्यात आल्या असुन आठ ते दहा दिवसामध्ये वर्क ऑर्डर देण्यात येईल असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. दिवाकर ध. राठोड** यांनी मागील सभेत दिग्रस तालुक्यातील मौजे चिरकुटा- दाभा या रत्यावर पंतप्रधान ग्राम सडक योजने अंतर्गत सुरु असलेल्या कामाची क्वॉलीटी कंन्ट्रोल मार्फत तपासणी करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. **त्यावर का.अ.(बांध.क्र.१)** यांनी तपासणी अहवाल उपलब्ध झाल्यानंतर सन्मा. सदस्यांना अवगत करुण देण्यात येईल असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी मागील सभेत ग्राम पंचायतचे ठिकाणी आरोग्य विभागाचे कर्मचारी यांचेमध्ये समन्वय नसल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर **जि.आ.अ.** यांनी ज्या ठिकाणी आरोग्य विभागातील कर्मचा-यांचे समन्वय नाही अश्या प्राथमिक आरोग्य केंन्द्रातील कर्मचा-यांची /अधिका-यांची वेतनवाढ रोखणेबाबतची कार्यवाही करण्यात येत असल्याचे सांगीतले.

**ठराव क्र. २-** **दिनांक १५.०५.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालास ही सभा मंजुरी प्रदान करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र.२-** **शासन आदेश व परिपत्रकाचे वाचन करणे.**

१.उप मु.का.अ.(पंचा.) यांनी राज्य नदी संवर्धन योजनाबाबत, संचालक, (पर्यावरण) महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक/संकिर्ण/२०११/प्र.क्र.२५/तां.क.१ दि.१ मार्च,२०१४ चे वाचन केले.

**विषय क्र.३-** **जिल्हा ग्राम विकास निधी माहे एप्रिल- २०१४ मध्ये झालेल्या जमा खर्चास मंजुरात देणेबाबत.**

विषयाची माहिती उप मु.का.अ.(पं.) यांनी सभेत दिली. जिल्हा ग्राम विकास निधीच्या जमा खर्चास महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १३६ अन्वये स्थायी समितीची मंजूरात घेणे आवश्यक आहे. माहे एप्रिल-२०१४ पर्यंत प्राप्त झालेल्या जमा खर्चाचे विवरण मंजूरीकरीता खालीलप्रमाणे सादर करण्यांत येत आहे. कृपया प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात यावी ही विनंती. सदर विषयावर चर्चा होऊन मा. सभापती (स्थायी समिती) यांनी खालीलप्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र.३ :-** **मुंबई ग्रा.प.अधिनियम १९५८ चे कलम १३६ अन्वये जि.ग्रा.वि.निधी माहे एप्रिल- २०१४ मध्ये झालेल्या जमा खर्चास ही सभा खालील प्रमाणे मंजुरी प्रदान करते.**

| | | |
|---|---|---|
| १ | महिण्यातील सुरवातीची शिल्लक | **९,९६,७८,२६२.४१** |
| २ | महिण्यातील जमा | **१,४६,५७८.००** |
| ३ | एकूण जमा रक्कम रुपये | **९,९८,२४,८४०.४१** |
| ४ | महिण्यात झालेला खर्च रक्कम रुपये | - |
| ५ | महिना अखेर शिल्लक रक्कम रुपये | **९,९८,२४,८४०.४१** |

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**<u>मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय :-</u>**

**विषय क्र.४-** **वाहन क्र.एम.एच.२९ एम ९५१३ व ९५१४ चे दुरुस्तीवरील होणा-या मर्यादेपेक्षा जादा खर्चास मंजुरी प्रदान करणेबाबत.**

विषयाची माहीती उप मु.का.अ.(सा) यांनी सभेत दिली. सामान्य प्रशासन विभागाअंतर्गत मा.सभापती (बांधका व अर्थ ) /मा. सभापती (समाज कल्याण समिती) जि.प. यवतमाळ यांचे अधिनस्त वाहन क्र. अनुक्रमे एम.एच.२९ एम ९५१३ व ९५१४ करिता दुरुस्ती व सुटे भाग खरेदी करण्याकरिता उप अभियंता (यांत्रीकी) भू. स. वि. य.

जि. प. यवतमाळ यांचे तांत्रिक मंजुरीचे प्रमाणपत्र व टाटा मोटर्सचे अधिकृत वाहन दुरुस्ती केंन्द्र मे. व्हि.एल.मोटर्स अमरावती यांचे प्राकलन प्राप्त झाले असुन सदर वाहनाचे सन २०१४-१५ मध्ये अनुक्रमे वाहन क्रमांक एम.एच.२९ एम ९५१३ वाहनास दुरुस्ती व सुटे भाग खरेदीवर रु. ८१,२००/- एवढा व एम.एच.२९ एम ९५१४ वाहनास दुरुस्ती व सुटे भाग खरेदीवर रु.१,२३,७००/- एवढा खर्च होणार आहे.

शासन निर्णयानुसार प्रत्येकी पेट्रोल वाहनास दुरुस्ती व सुटे भाग खरेदी करीता रु.४०,०००/- इतकी मर्यादा असल्यामुळे दोन्हीही वाहनाचे प्राप्त प्राकलनानुसार एकुण खर्च रु.२,०४,९००/- **सदर दोन वाहनावरील** वार्षिक मर्यादा रु.८०,०००/=१,२४,९००/- अतिरीक्त खर्चास मंजुरी घेणे आवश्यक आहे.

शासन निर्णय क्र. जेईपी १०९९ /प्र.क्र.१३५/०५ दि.३१ ऑगस्ट १९९९ मधील **जोडपत्र " क"(५)** नुसार अतिरिक्त खर्चास स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे. करिता सदहु प्रस्ताव स्थायी समितीचे मंजुरीस्तव सविनय सादर. कृपया प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात यावी ही विनंती.

| अ.क्र. | वाहन वापरणारे मा. पदाधिकारी | वाहन क्रमांक | सन २०१४ -१५ मध्ये वाहनावर आतापर्यत झालेला खर्च रुपये | बॅटरी /टायर व टयुब खर्च | प्रस्तावित दुरुस्ती / सुटे भाग खरेदी | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मा. सभापती (बांध.व अर्थ ) समिती | एम.एच.२९ एम ९५१३ | निरंक | निरंक | रु.८१,२००/- | रु.८१,२००/- |
| २ | मा. सभापती (समाज कल्याण ) समिती | एम.एच.२९ एम ९५१४ | निरंक | निरंक | रु.१,२३,७००/- | रु.१,२३,७००/- |

सदर विषयावर चर्चा होऊन मा. सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष जि.प. यवतमाळ यांनी खालीलप्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र.४ :-** **सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत मा. सभापती (बांध.व अर्थ) समिती तसेच मा. सभापती (समाज कल्याण ) समिती जिल्हा परिषद यवतमाळ यांचे अधिनस्त असलेल्या उपरोक्त वाहनाचे दुरुस्ती व सुटे भाग खरेदी खर्च भागविण्याकरिता सन २०१४-१५ मधील होणा-या अपेक्षित खर्चास तथा मालमत्ता संपादनास ही सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करित आहे. तसेच वाहनावरील मर्यादेपेक्षा जादा खर्च रुपये १,२४,९००/- चे वरील होणा-या खर्चास मंजुरी मिळण्यास विभागीय मा.आयुक्त, अमरावती विभाग अमरावती यांना प्रस्ताव सादर करण्यास ही सभा शिफारस करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र.५:-** **बी. ओ. टी. प्रकल्पांच्या निविदा तारखा निश्चित करण्याबाबत.**

विषयाची माहिती कार्यकारी अभियंता बांध क्र.१ यांनी सभेत दिली. यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत बांधा वापरुन हस्तांतरण करा तत्वावरील प्रकल्पांची सद्यास्थिती खालीलप्रमाणे आहे. यवतमाळ जिल्हा परिषदेने एकूण १३ प्रकल्प आजपर्यंत प्रस्तावित केले आहेत ते खालीलप्रमाणे आहेत.

१) कळंब.
२) वडगाव रोड.
३) पंचायत समिती कार्यालय व काटेबाई शाळा यवतमाळ.
४) पशूवैद्यकीय दवाखाना व प्राथमिक शाळा नेर परिसर.
५) जि. प. बांधकाम विभाग पुसद.
६) जि.प. माध्यमिक विद्यालय, पुसद.
७) जि. प. माध्यमिक विद्यालय उमरखेड.
८) जि. प. माध्यमिक विद्यालय, वणी.
९) ग्रामपंचायत कार्यालय मुळावा समोरील जागा ता. उमरखेड.
१०) रासा ता. कळंब रस्त्यास लागून असलेली जागा.
११) पं. स. कार्यालय, राळेगाव.
१२) आरोग्य विभाग परिसर, यवतमाळ.
१३) ढाणकी ता. उमरखेड.

वर नमुद प्रस्तावित प्रकल्पापैकी वडगांव रोड, पंचायत समिती कार्यालय व काटेबाई शाळा परिसर व पशुवैद्यकीय दवाखाना व मराठी शाळा नेर परिसर व कळंब येथिल प्रस्तावांना शासनाकडून सुसाध्यता अहवाल, तांत्रिक मान्यता व प्रारुप निविदा मंजूरी प्राप्त आहे. सदर मंजूरीनुसार वडगांव रोड, पं. स. कार्यालय व काटेबाई शाळा परिसर व पशूवैद्यकीय दवाखाना व मराठी शाळा नेर या प्रकल्पांचा निविदा ३ वेळेस प्रसिध्द केल्या होत्या. तसेच कळंब येथिल प्रकल्पाची निविदा एक वेळेस प्रसिध्द केलेली आहे. निविदेस अल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे पुढील कार्यवाही करता आलेली नाही. पशूवैद्यकीय दवाखाना व माध्यमिक शाळा नेर ची जागा नेर नगर पंचायतीने ताब्यात घेतलेली आहे.

वर नमुद प्रकल्पांचे प्रस्ताव प्रकल्प सल्लागार डि. ए. पाटील कंन्सलटंन्ट यांनी तयार करुन प्रस्तावास त्यांनी मान्यता प्राप्त करुन घेतलेली आहे. उर्वरीत प्रस्तावित प्रकल्पापैकी जि. प. बांधकाम उप विभाग पुसद आरोग्य विभाग परिसर यवतमाळ जि. प. माध्यमिक विद्यालय उमरखेड या प्रकल्पांचे सुसाध्यता अहवाल प्रकल्प सल्लागार डि. ए. पाटील कंन्सलटंन्ट यांचेकडून तयार करण्यात आलेले आहेत. जि. प. माध्यमिक विद्यालय उमरखेड हा प्रस्ताव शासनाचे सुसाध्यतेबाबतचे निकषात बसत नाही.

जि. प. माध्यमिक विद्यालय वणी. पं. स. कार्यालय राळेगाव. या जागांचे सर्वेक्षण प्रकल्प सल्लागार डि. ए. पाटील कंन्सलटंन्ट यांनी केलेले असून त्या जागांचे कागदपत्रे जमा करण्याचे काम चालू आहे. उर्वरीत ग्रामपंचायत कार्यालय समोरील जागा मुळावा ता. उमरखेड, रासा ता. कळंब रस्त्यास लागून असलेली जागा. ढाणकी ता. उमरखेड या जागांचे प्रस्ताव अलिकडेच जि. प. सदस्यांनी प्रस्तावित केलेल्या आहेत. त्या जागांचे सर्वेक्षणाचे काम चालू आहे.

कळंब ता. कळंब जिल्हा यवतमाळ जि.प. अंतर्गत ग्राम पंचायत कळंब मालकीच्या जागेवर बी. ओ. टी. तत्वावर विकास योजना विकसीत करणे करीता दि. १/९/२००८ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही प्रगतीत असुन प्राकलनास खालील प्रमाणे मान्यता प्राप्त झाली आहे.

कळंब ता. कळंब जि. यवतमाळ येथील सर्वे नं. १२५३ या जागेचा बी. ओ. टी. तत्वावर विकास करणे ( शाळा इमारत व दुकान गाळे बांधणे)

१) अंदाजित रक्कम :- रु. ८६७.८४ लक्ष

२) सुसाध्यता अहवाल :- मुख्य अभियंता प्र.प.ग्रा.स.यो. मंत्रालय मंबई यांचे पत्र.क्र. ६२७
दिनांक ८/८/११

३) तांत्रिक मान्यता :- --------------------//------------- पत्र क्र. ११८९ दि. ७/७/१२

४) डि.टी.पी. मंजुर :- मुख्य अभियंता प्र.मं.ग्रा.स.यो. मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. ११४१
दिनांक ११/९/१२

यापुर्वी सन १२-१३ मध्ये वरिल प्रमाणे कामाच्या निविदा काढण्यात आलेल्या होत्या परंतु प्रतिसाद न मिळाल्यामुळे प्रस्ताव पुढे गेला नाही त्यानंतर "इ" निविदा प्रक्रिया शासनाने लागु केल्याप्रमाणे शासन निर्णयानुसार "इ" निविदा प्रक्रिया करणे आवश्यक असुन वरील प्रमाणे मंजुरी प्राप्त झाले असल्याने निविदा दिनांका बाबत निश्चिती करणे आवश्यक आहे. यापुर्वी निविदा मागविलेल्या होत्या परंतु योग्य प्रतिसाद न आल्याने पुनश्च फेर निविदा मागविण्यात येत आहे.

कळंब या प्रकल्पांची ई-निविदा पुन्हा प्रसिध्द करण्याच्या सुचना मा. अध्यक्ष यांनी दिलेले आहे. त्यानुसार निविदा प्रसिध्द करण्याकरीता आज दिनांक १३/०६/२०१४ रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये निविदा विक्रीची, निविदा पुर्व बैठकीची व निविदा उघडण्याच्या तारखेस मान्यता घेण्यासाठी स्थायी समितीच्या बैठकीपुढे सोबत जोडलेली निविदा सुचना ठेवलेली आहे. त्यात निविदा विक्रीची तारीख दि. १९/०६/२०१४ पासून दि. २६/०६/२०१४ पर्यंत आहे. निविदा पुर्व बैठक दि. २४/०६/२०१४ रोजी व दि. ०१/०७/२०१४ रोजी निविदा उघडण्याची तारीख प्रस्तावित केलेली आहे करिता सदर प्रस्तावास कृपया मान्यता प्रदान करण्यात यावी ही विनंती. सदर विषयावर चर्चा होऊन मा. सभापती (स्थायी समिती) तथा अध्यक्ष जि.प.यवतमाळ यांनी खालीलप्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र.५ :-** **कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम विभाग क्रंमाक-१ यांनी विषयात नमुद केल्यानुसार कळंब या प्रकल्पांची ई-निविदा पुन्हा प्रसिध्द करण्याच्या बी. ओ. टी. प्रकल्पांच्या निविदा तारीख निश्चितीचे उपरोक्त नमुद प्रस्तावास ही सभा मान्यता प्रदान करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय पत्रिकेवरील विषय संपल्यानंतर खालीलप्रमाणे चर्चा घडुन आली.**

**सन्मा सदस्य सौ. उमाताई वि. पिदुरकर** यांनी खनिज विकास नळ योजना सावंगी येथे सुरू होती, ती बंद का झाली व याबाबत काय झाले अशी विचारणा केली असता **का.अभि.(पा.पु.)** यांनी सदर योजनेवर निधी उपलब्ध नसल्याचे सांगितले. तसेच सन्मा. सदस्य यांनी मौजे पुनवट येथील पाईप लाईन बाबतचा मुद्दा उपस्थित करुन लवकरात लवकर काम पूर्ण करण्यात यावे असे सांगितले.

**सन्मा सदस्य सौ. उमाताई वि. पिदुरकर** यांनी सिकलसेल करिता रक्त साठवणूक केंद्राची मान्यता आली काय याबाबतची विचारणा केली असता **जि.आ.अ.** यांनी अद्यापावेतो शासनाकडून मान्यता प्राप्त झाली नसल्याचे सांगुन याबाबतचा पाठपुरावा करण्यात येईल असे सांगीतले.

**सन्मा सदस्य सौ. उमाताई वि. पिदुरकर** यांनी वणी तालुक्यातील मौजा तरोडा, पुनवट येथे अकृषक परवानगी नसतांना सबंधित ग्राम पंचायतीने कोणत्या आधारावर बीअरबारला परवानगी दिली याबाबतची चौकशी करुन अहवाल मागविण्यात यावा असे सांगीतले. त्यावर **मा.उप.मु.का.अ.(पंचा.)** यांनी उक्त प्रकरणात चौकशी अहवाल मागविण्यात आला असल्याचे सांगीतले.

**सन्मा सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी पाणी टंचाईबाबत आराखडा मंजूर करतांना सन्मा. जि.प.सदस्यांना विश्वासात घेतले जात नसल्याचे सांगीतले. **त्यावर मा.सभापती (स्थायी समिती)** यांनी आज रोजीच्या सभेतील निर्णय समजुन सर्व सन्मा. जि. प. व पं.स. सदस्यांना बोलावून पाणी टंचाई बाबतचा कृती आराखडा तयार करण्यात यावा असे निर्देश का.अ.(पा.पु. ) यांना दिले.

**सन्मा सदस्य सौ. संगीताताई अ. राजुरकर** यांनी वणी तालुक्यातील निंबाडा गावामध्ये विंधन विहिर मंजूर आहे, परंतु दोन वर्षे झाले पावसाळ्यात विंधन विहिरीचे कामाकरीता मशीन पाठविल्या जाते तसेच यावर्षी विंधन विहिर रद्द झाली असल्याचे सांगीतले. त्यावर **उप अभि. (यांत्रिकी** ) यांनी सदर्हु कामासाठी गट विकास अधिकारी यांचेकडे निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता तरी त्यांनी काम करावयास पाहिजे होते असे सांगीतले.

**सन्मा सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी बी.ओ.टी. तत्वावरील बांधकामे केंव्हा सुरु करणार आहेत याबाबतची विचारणा केली. तसेच घाटंजी येथे बस स्टँड जवळ पोलिस स्टेशन समोरील असलेल्या रेस्ट हाऊसची आठ ते दहा हजार चौ.फुट जागा असुन त्याचा उत्पन्न वाढविण्यासाठी उपयोग करता येईल, असे सांगीतले.

**मा. श्री. मनमोहनसिंग अ.चव्हाण, सभापती (शिक्षण व आरोग्य) समिती** यांनी दिग्रस मधील जि.प.च्या असलेल्या जागेचा विकास करण्यात यावा असे सांगीतले.

**सन्मा सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी मागिल वर्षी अनुसूचित जमातीमध्ये केंद्र प्रमुखांच्या झालेल्या पदोन्नती बाबतची माहिती देण्यात यावी असे सांगीतले. **त्यावर मा.सभापती (स्थायी समिती)** यांनी सन्मा. सदस्यांनी मागणी केल्यानुसार सविस्तर माहिती घेऊन पुढील सभेमध्ये सादर करण्याचे **निर्देश शि.अ.(प्राथ.) यांना दिले.**

**सन्मा सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी जिल्हा परिषदेच्या स्तरावर किती चौकशी समित्या कार्यान्वित आहे व त्याची सद्यस्थिती बाबत ची माहिती देण्यात यावी असे सांगीतले. त्यावर उप मु.का.अ.(सा.) यांनी जि.प.स्तरावरील दोन समित्या स्थापन करण्यात आल्या असल्याचे सांगुन चौकशी समितीचे प्रमुख मा.सभापती (बांध.व अर्थ) समिती हे आहेत. तसेच भजनी साहित्य निकृष्ठ दर्जाचे पुरविल्याबाबत तत्कालीन समाज